# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3542/शि.वि./2014
दि. 23/12/2014

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर

**विषय :– धोकादायक इमारत व खेळणी व वस्तु दुरूस्तीबाबत आपले झोनचे सहा. आयुक्त यांना माहिती देण्याबाबत.**

**संदर्भ :–** 1) मा. श्री. प्रकाश उराडे, अधिक्षक अभियंता, म.न.पा., यांचे पत्र क्र. मनपा/अअ/895/2014 दि. 18.12.2014.
2) सहा. आयुक्त, झोन क्र.8 म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र.4031/Ac/8 दि. 19.12.2014.

संदर्भीय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या शाळेतील जीर्ण, मोडकळीस आलेली भिंत, सरक्षण भिंत (वॉल कंपाऊड) तसेच ग्रील, खिडकी-दरवाजे यांची तपासणी करून तो भाग शिकस्त किंवा क्षतीग्रस्त असल्यास त्याची महिती आपले झोनचे सहा. आयुक्त यांना देण्याबाबत संदर्भिय पत्राबाबत कळविले आहे. शाळेतील ज्या धोकादायक बाबींची त्वरीत दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्याची त्वरीत दुरूस्ती आपले झोनचे सहा. आयुक्त यांचे सहाय्याने करून घ्यावी. तसेच धोकादायक वस्तू , शालेय परिसरातील खड्डे, घसरपट्टी व तुटलेले खेळणे ज्यापासून विद्यार्थ्यांना शारीरीक इजा होवू शकते. अश्या धोकादायक बाबींचा शोध घेवून त्यांची दुरूस्ती अथवा ते शालेय परिसरातून काढून टाकण्याबाबत आपल्या झोनचे सहा. आयुक्त यांना त्वरीत कळवावे. जेणेकरून भविष्यात विद्यार्थ्यांना सूरक्षित व निर्भयपणे शाळेत शिक्षण देता येईल.

विद्यार्थ्यांना शालेय वेळेत शालेय परीसरात काही दुखापत, जिवीत व वित्त हानी झाल्यास याबाबत सर्वस्वी आपणांस जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका नागपूर.